# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ ई, शिवाजीगर, पुणे ४११ ०१६**

☎ २५६५६२३४ E-mail : : ropune.dte@gmail.com


---

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०१७/ १७०१ दि. 03 MAY 2017

**कार्यालयीन आदेश :**

संदर्भ - १) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शा नि.क्र. जीईसी/३३९६/(७३७६)/तांशि-१ दिनांक १०/४/१९९७.

२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा नि.क्र. संकिर्ण-२०१५/(०१/१५)/मशि-१ दि.२५/०५/२०१५

३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र .संकिर्ण-२०१६/प.क्र.(८८/१६)/तांशि-१ दि.१२/०५/२०१६

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व संदर्भ क्र. २ आणि ३ अन्वये गठित केलेल्या नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन निम्नस्वाक्षरीकार हे त्यांच्या अधिपत्याखालील **गट-ड** मधील **हमाल** पदावर कार्यरत कर्मचा-यांचे **गट-क** मधील **जोडारी** पदावर पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश, पुढील आदेश देईपर्यंत, खालीलप्रमाणे निर्गमित करीत आहेत.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव, पदनाम व कार्यरत संस्था/ कार्यालय | कर्मचा-याचा जातीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.पी.बी.जाधव, हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | इ.मा.व. | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे रिक्त असलेल्या जोडारी पदावर | खुल्या प्रवर्गातून पदोन्नती |

उपरोक्त कर्मचा-यांची पदोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यांत येत आहे.

१. पदोन्नतीमुळे संबंधीताना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएवाय./१०८२/सीआर-११०० (एक) एसईआर-३ दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्यांच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करावा लागेल.

२. महाराष्ट्र नागरी सेवा(संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ नुसार त्यांनी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र. ६१/२००१/३९ दिनांक १९/३/२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीपूर्वी विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले नाही तर त्यांना पदावनत करण्यात येईल.

३. जर ते माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी/हिंदी विषयासह उत्तीर्ण नसतील, तर त्यांना एतदर्थ मंडळाची, हिंदी / मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा त्यांची वेतनवाढ रोखण्यांत येईल.

४. कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या या व्यापक लोकहितार्थ व प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आले असल्याने सदर आदेशाविरुध्द कोणत्याही अभिवेदनाचा विचार केला जाणार नाही.

५. सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणेसाठी संस्थाप्रमुखांनी संबंधीत कर्मचाऱ्यास पर्यायी व्यवस्था करुन त्वरीत कार्यमुक्त करावे.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

१. संबंधित कर्मचारी (संस्थाप्रमुखांमार्फत)
२. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, सोलापूर
३. मा. कोषागार अधिकारी, सोलापूर (संस्था प्रमुखामार्फत)
४. गोपनीय विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
५. आस्थापना ३ (अ) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
६. कार्यालयीन आदेश धारीका